महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालयमहात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था ,यवस्थापकीय संचालक
(महाज्योती)महाराष्ट्र राज्य नागपूर
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotingp@gmail.com

जावक क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/२७८७/२०२३-२४ दि. २१/१२/२०२३

# -:परिपत्रक:-

**विषय:- संघ लोकसेवा आयोग (UPSC) परीक्षा पूर्व प्रशिक्षण २०२३-२४ अंतर्गत प्रतिक्षायादीकरिता विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचे माध्यम निवडण्याकरिता लिंक उपलब्ध करून देणे बाबत.**

महाज्योतीमार्फत दि. २९ ऑक्टोबर २०२३ व ०४ नोवेंबर २०२३ रोजी **संघ लोकसेवा आयोग (UPSC) २०२३-२४** परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता चाळणी परीक्षा घेण्यात आलेली होती. विद्यार्थ्यांच्या बैठक क्रमांकानुसार प्राप्त गुणांची यादी दि.१६/११/२०२३ रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण केंद्र निवड करण्याचा पर्याय दि.०६/१२/२०२३ ते दि.११/१२/२०२३ पर्यंत महाज्योतीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले होते.

या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी नोंदविलेल्या पर्यायानुसार १७५५ विद्यार्थ्यांची निवड यादी दि.१४/१२/२०२३ व १२ विद्यार्थ्यांची निवड यादी दि.२०/१२/२०२३ रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. निवड झालेल्या १७५५ विद्यार्थ्यांना नमूद करून देण्यात आलेल्या प्रशिक्षण संस्थेत दि.२६/१२/२०२३ व १२ विद्यार्थ्यांना श्रीराम आय. ए. एस दिल्ली येथे दि.३०/१२/२०२३ पर्यंत रुजू होण्याकरिता मुदत देण्यात आली आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी विहित मुदतीस प्रवेश निश्चित करू शकले नाही त्या विद्यार्थ्यांच्या ऐवजी प्रतिक्षा यादीमधील विद्यार्थ्यांची निवड करून लवकरच प्रतिक्षा यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. ज्या विद्यार्थ्यांची निवड झालेली नाही अशा सर्व विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचे माध्यम निवडण्याचा पर्याय, विद्यार्थ्यांना त्यांच्या अर्जामधील जातीची वर्गवारी, लिंग, दिव्यांग किंवा अनाथ असल्याबाबतच्या नोंदी सुधारण्यासाठी पुन:श्च महाज्योतीच्या संकेतस्थळावर दि.२५/१२/२०२३ दुपारी ३.०० पर्यंत लिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे.

उपलब्ध करून देण्यात आलेल्या लिंक द्वारे विद्यार्थ्यांनी आपली माहिती गरज असल्यास सुधारित करून घ्यावी तसेच प्रशिक्षणाचे माध्यम निवडावे. विद्यार्थ्यांनी केलेल्या नोंदणीच्या आधारे प्रतिक्षा यादीमध्ये विद्यार्थ्यांचे गुण विचारात घेऊन निवड करण्यात येईल. **विद्यार्थ्यांनी चुकीची माहिती भरल्यास आणि संस्थेची निवड न केल्यास त्यांची निवडीकरिता कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही** याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

(स्वा)
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण
संस्था, (महाज्योती), नागपूर